**महानगर दंडाधिकारी यांचे ६७वे न्यायालय, बोरीवली, मुंबई**
**(पिठासीन अधिकारी – अभय दि. घुगे )**

**केस क्र.३९२/डिव्ही/२०२१**

लता अरुण निर्मळे .... अर्जदार

विरुध्द

अरुण विनायक निर्मळे व इतर .... प्रतिवादी

**आदेश नि.क्र. ३**

**संक्षिप्त स्वरुपात खालील प्रमाणे कथने व प्रतिकथने मांडण्यात येत आहेत ती अशी**

१. अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज महिलांचा घरगुती छळापासून संरक्षण कायदा २००५ कलम १२, १७, १८, १९, २०, २२ आणि २३ अंतर्गत असलेल्या विविध उपकलमान्वये अंतरिम अनुतोष मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार हिच्या म्हणण्याप्रमाणे गैरअर्जदार याने तिचा घरगुती छळ केलेला आहे व तिला घरात मिळणा–या निवा–यापासून व तसेच आर्थिक मदतीपासून वंचित ठेवलेले आहे. त्यामुळे ती स्वत:चे पालनपोषण करण्यांस असमर्थ आहे. त्यामुळे तिला सध्यपरिस्थितीत हालाखीत जगावे लागत आहे.

३. अर्जदार हिने असे कथीत केले आहे की गैरअर्जदार क्र.१ हा तिचा पती आहे. तसेच गैरअर्जदार क्र.२ ही तिची नणंद आहे. गैरअर्जदार क्र. ३ हा गैरअर्जदार क्र.२ चा मुलगा आहे. गैरअर्जदारांनी तिचा मानसिक व शारिरीक छळ करुन घरगुती हिंसाचार केलेला आहे. गैरअर्जदार क्र.१ व अर्जदार यांचा विवाह दिनांक २६.११.१९९७ रोजी हिंदु रितीरिवाजाप्रमाणे

संपन्न झाला. गैरअर्जदार क्र.१ व अर्जदार यांना रोहीत नावाचा मुलगा आहे. गैरअर्जदार क्र.१ हा दारु पिउन घरी येत असे व दारुच्या नशेत अर्जदाराशी भांडण करीत असे. अर्जदाराने पुढे असे कथन केले की अर्जदाराने आपल्या उपजिविकेसाठी तात्पुरत्या स्वरुपात नर्सची नोकरी स्वीकारली. जेव्हा अर्जदाराने नोकरी करायला सुरवात केली त्यावेळी गैरअर्जदार क्र.१ ची संशयित वृत्ती वाढत गेली आणि तो मानसिक रुग्ण असल्यासारखा वागु लागला. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार जिथे काम करीत असत त्याठिकाणी जात असे व त्यांचा पाठलाग करीत असे. जेव्हा अर्जदाराने याबाबत विचारणा केली तेव्हा तो त्यांना अश्लिल भाषेत शिवीगाळ करीत असे व त्यांना क्रुरपणे मारहाण करीत असे.

४. अर्जदार हीने उत्पन्न –खर्चाच्या प्रतिज्ञापत्रात ती बारावी नापास असुन ती डॉ आनंद राणे यांच्याकडे नर्स म्हणुन काम करते व तिचे मासिक उत्पन्न रुपये १४,०००/– आहे असे कथन केले आहे. गैरअर्जदार नं १ हा झोमॅटो मध्ये डिलीव्हरी बॉय म्हणुन काम करत असुन त्याचे मासिक उत्पन्न रुपये १५,०००/– असल्याचे सांगितले आहे. अर्जदार हीने तिच्यासाठी व तिच्या मुलांसाठी एकुण दरमहा रुपये १०,०००/– अंतरिम अनुतोष मिळण्याची विनंती केली आहे.

५. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराने केलेले सर्व कथने फेटाळून लावली आहेत. गैरअर्जदार क्र.१ याने त्याच्या उत्पन्न –खर्चाच्या प्रतिज्ञापत्रात तो सातवी पास असुन सध्या त्याला नोकरी नाही. त्याचे मासिक उत्पन्न दरमहा ३,०००/– रुपये असे आहे असे कथन केले आहे.

६. अर्जदार व गैरअर्जदार यानी दाखल केलेल्या कथना व प्रतिकथनावरुन पुढील मुददे विचारार्थ उपस्थित होतात ज्यावर खालील नमुद कारणान्वये निष्कर्ष नोंदविण्यांत येतो.

| मुददे | निष्कर्ष |
| --- | --- |
| १. अर्जदार हि सकृतदर्शनी असे शाबित करते की ती विनंती मागणी केलेल्या अनुतोषास पात्र आहे का? | अंशत: होकारार्थी अंतरिम पोटगीस पात्र |
| २. आदेश | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

७. अर्जदार यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील दाखल प्रतिकथानाचे व कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले.

८. प्रस्तुत प्रकरणांत गैरअर्जदारांनी अर्जदाराबरोबर असलेले नातेसंबंध नाकारलेले नाही. अर्जदाराने जरी इतर बाबींबाबत व प्रतिबंधात्मक आदेशाबाबतची मागणी केलेली असली तरी याबाबतीत सदयप्रकरणांतील परिस्थिती पाहता तसा आदेश देणे उचित होणार नाही. अर्जदार हिने तिच्यासाठी व तिच्या मुलासाठी मिळुन अंतरिम पोटगीबाबत एकुण रक्कम दरमहा रुपये १०,०००/—मागितली आहे. गैरअर्जदार क्र.१ व अर्जदार यांचा मुलगा हा सज्ञान आहे. अर्जदार हिने केलेली मागणी अवाजवी व अवास्तव आहे व वस्तुस्थितीशी धरुन नाही तसेच उत्पन्नाचा उचित असा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. एकंदरीत अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमान तसेच आर्थिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेता व उत्पनाच्या शपथपत्रातील बाबी विचारार्थ घेता अर्जदार रुपये २,५००/— (दोन हजार पाचशे) दरमहा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून घेण्यांस पात्र होतात हा निष्कर्ष नोंदविण्यांस कोणतीही अडचण नाही. सबब, मुददा क्र. १ वरील निष्कर्ष अशंत: होकारार्थी नोंदवून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे:—

## <u>आदेश</u>

१. गैरअर्जदार क्र.१ यांनी दरमहा रुपये २,५००/— (दोन हजार पाचशे) अर्जदारास अंतरिम पोटगी म्हणुन अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून ते मूळ अर्ज निकाली निघेपर्यंत देण्यांत यावेत.

२. या आदेशाची प्रत पक्षकारांस विनामुल्य देण्यांत यावी.

३. खर्चाविषयी आदेश नाही.

(खुल्या न्यायालयात उदघोषित करण्यांत आला)

दिनांक — २६/०४/२०२४

**(अभय दि. घुगे)**
महानगर दंडाधिकारी,
६७ वे न्यायालय, बोरीवली,मुंबई

टंकलिखीत केले — २६.०४.२०२४
स्वाक्षरी केली — २६.०४.२०२४
अशिकु